# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**


**No,CGRF/AZ/U / 197 / 2009 / 31** **Date :-**

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer ,
O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub:- Forwarding of grievance submitted by Shri Eknath Sakharam Salve, Nakshatrawadi,Paithan Road, Aurangabad. (Consumer No.49036002770)

Dear Sir,

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Eknath Sakharam Salve, Nakshatrawadi, Paithan Road, Aurangabad.

The consumer has requested the Forum to pass an interim order in his matter. You are requested to submit your reply on the grievance at the time of hearing..

The hearing in this matter is kept on 26.03.2009 at 11=30 Hrs.

Encl: As above

**Member/Secretary**
**CGRF(AZ) MSEDCL**
**Aurangabad.**

**Copy to:-**

Shri Eknath Sakharam Salve,
Nakshatrawadi, Paithan Road,
Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१९७/२००९/३१**

**तक्रार दाखल दिनांक :- २३/०३/२००९**
**निकाल दिनांक :- २२/०५/२००९**

**श्री एकनाथ सखाराम साळवे,**
**नक्षत्रवाडी पैठण रोड,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९०३६०००२७७०) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २३/०३/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २६/०३/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकाने घरगुती वीज वापरासाठी वीज वितरण कंपनीकडुन दिनांक २९/०९/१९९२ रोजी घेतला आहे. त्यांचा ग्राहक क्रमांक ४९०३६०००२७७० असा आहे.ग्राहकाची माहे मार्च २००८ पर्यत वीज बिलाबाबत कोणतीही तक्रार नाही. तसेच मार्च २००८ पर्यत त्यांनी नियमितपणे वीज देयके भरली आहेत.एप्रिल २००८ मध्ये त्यांना रुपये ४५५०४.७०/- चे देयक देण्यात आले. व माहे मे २००८ मध्ये चालु बिल रुपये ६८२८.८२/- व त्यावर थकबाकी रुपये ४६४१४.७७/- दर्शवून एकुन रुपये ५३२४३.५९ एवठ्या रक्कमेचे बिल देण्यात आले.ग्राहकाने वरील चुकीच्या व अवास्तव बिलाबाबत महावितरण कंपनीच्या उपकार्यकारी अभियंता छावणी उपविभाग यांच्याकडे दिनांक २४/०६/२००८ रोजी लेखी तक्रार केली तसेच वरील कार्यालयात बिल दुरुस्तीकरीता वारंवार भेट दिली परंतु वीज बिल दुरुस्ती करुन देण्यात आले नाही. याउलट दिनांक १९/०३/२००९ रोजी मीटर काढून विद्युत पुरवठा बंद करण्यात आला त्यानंतर ग्राहकास रुपये १५००/-तातपुरते देयक व रीकनेक्शन चार्जस रुपये २५/- छावणी उपविभागाकडुन देण्यात आले.ते त्यांनी दिनांक २०/०३/२००९ रोजी भरल्यानंतरही विजपुरवठा सुरु करण्यात आला नाही.त्यामुळे ग्राहकाने मंचात तक्रार दाखल केली आहे.ग्राहकाने नविन मीटर बसवुन विद्युत पुरवठा सुरु करण्यास अंतरीम आदेश देण्याबाबत मंचास विनंती केली. तसेच अवास्तव व चुकीचे वीज बिल दुरुस्त करुन मिळण्याबाबत व झालेल्या मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई मिळवुन देण्याची विनंती मंचास केली आहे.

२)	दिनांक २६/०३/२००९ रोजी मंचात झालेल्या सुनावणी मध्ये ग्राहक श्री एकनाथ सखाराम साळवे व महावितरण कंपनीतर्फे नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी जवाबदाखल करण्याकरीता तारीख वाढवुन मिळण्याबाबत मंचास विनंती केली ग्राहकाने दाखल केलेल्या कागद पत्रावरुन व बिलावरुन त्यांना महावितरण कंपनीकडुन चुकीची वीज बिले देण्यात आल्याचे व कोणतीही पुर्व सुचना न देता ग्राहकाचा वीज पुरवठा बंद करण्यात आल्याचे आढळुन आले नोडल अधिकारी ग्राहका कडुन घेणे असलेल्या वीज बिलाबाबत निश्चीतपणे माहिती सादरकरु शकले नाहीत, त्यामुळे कोणतीही रक्कम भरुन न घेता ग्राहकाचा वीज पुरवठा नविन मिटर बसवुन सुरु करण्याचे आदेश नोडल अधिकारी यांना मंचाने दिले व पुढील सुनावणी दिनांक ०८/०४/२००९ रोजी ठेवण्यात आली.

३)	दिनांक ०८/०४/२००९ रोजी ग्राहक श्री साळवे व नोडल अधिकारी श्री राठौर उपस्थित होते नोडल अधिकारी यांनी त्याचा जवाब व सी.पी.एल.सादर केले तसेच मिटर रिडींग प्रमाणे ग्राहकाचे बिल योग्य असल्याचे सांगितले मंचाने त्यांना माहे एप्रिल मध्ये एकदम व अवस्तवपणे आकारण्यात आलेल्या ६९५० युनिट बाबत खुलासा करण्यास सांगितले असता त्याबाबत ते योग्य खुलासा करु शकले नाहीत मंचाने नोडल अधिकारी यांना सप्टेबर २००६ मध्ये बदली करण्यात आलेल्या मिटरचा अहवाल पी.डी.रिपोर्ट व स्थळ निरीक्षण अहवाल सादर करण्यास सांगितले व पुढील तारीख दिनांक १५/०४/२००९ रोजी ठेवण्यात आली.

४)	दिनांक १५/०४/२००९ रोजी ग्राहक श्री साळवे, व नोडल अधिकारी उपस्थित होते, नोडल अधिकारी यांनी स्थळ निरीक्षण अहवाल सादर केला परंतु मिटर बदली अहवाल व माहे एप्रिल २००८ मध्ये देण्यात आलेल्या अवास्तव वीज बिलाबाबत खुलासा सादर केला नाही.दोन्ही पक्षाची बाजु ऐकुन घेतल्या नंतर प्रकरण निकासाठी ठेवण्यात आले.

५) दोन्ही बाजुकडुन दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन व ग्राहकाच्या सी.पी.एल.वरुन असे अढळुन येते की, ग्राहकाचा माहे मार्च २००८ पर्यंत कोणताही वाद नव्हता व तोपर्यत ग्राहकाने वीज बिल नियमितपणे भरले आहे.माहे एप्रिल २००८ मध्ये ग्राहकाचे मागील रिडींग ७०६ व चालु ७६५६ दाखवुन ६९५० युनिटचे रुपये ४५५०४.७०/- चे देयक देण्यात आले व त्यानंतर माहे जानेवारी २००९ पर्यत सरासरीवर आधारीत दर महा ११९९ युनिटची वीज बिले आकारण्यात आली.ग्राहकाने अवास्तव वीज बिल आकारणी बाबत २३/०६/२००८ रोजी उपकार्यकारी छावणी उपविभाग यांना लेखी तक्रार दिली परंतु देयक दुरुस्त करुन न देता विद्युत पुरवठा दिनांक १९/०३/२००९ रोजी कायमचा बंद केला नोडल अधिकारी यांनी दिनांक २१/०५/२००८ रोजी रुपये ५३२४३/- थकीत बाकी भरण्याबाबत पंधरा दिवासाची नोटीस ग्राहकास दिल्याबाबत प्रत सादर केली परंतु त्यावर मिळाल्याबाबत ग्राहकाची सही नाही. नोडल अधिकारी यांनी सादर केलेल्या पी.डी रिपोर्ट वरुन दिनांक १९/०३/२००९ रोजी वरील मिटरचे अंतीम वाचन १४४८४ असल्याचे अढळुन येते यावरुन वरील मीटर माहे मार्च २००८ ते १९/०३/२००९ या कालावधीत (१४४८४-७०६)=१३७७८ युनिट वीज वापर झाल्याचे दर्शवीत आहे. कनिष्ठ अभियंता छावणी उपविभाग यांनी दिनांक १३/०४/२००९ रोजी केलेल्या स्थळ निरीक्षण अहवालावरुन व नविन मीटरच्या रिडींग वरुन ग्राहकाचा वीज वापर सरासरी ०२ युनिट प्रतिदिन म्हणजे ६० युनिट प्रतिमाह ग्राहकाचा वीज भार केवळ १४० वॉट असल्याचे नमुद केले आहे.यावरुन पी.डी.रिपोर्ट मध्ये नोंदविलेले अंतीम वाचन १४४८४ हे चुकीचे असल्याचे दिसून येते. अंतीम मीटर रिडींगची सत्यता पडताळुन पाहण्याकरीता, नोडल अधिकारी यांना मीटर बदली रजिस्टरची मागणी केल्यानंतर ते मंचास दाखल करु शकले नाही त्यामुळे स्थळनिरिक्षण अहवालानुसार व ग्राहक वापरत असलेल्या लोडनुसार वीज आकारणी करणे योग्य राहील असे मंचाचे मत आहे.वरील सर्व बाबीवरुन असे दिसुन येते की, महावितरण कंपनीने वीज ग्राहकास माहे एप्रिल पासुन विद्युत पुरवठा खंडीत करेपर्यत म्हणजे दिनांक १९/०३/२००९ पर्यंत केलेली

वीज आकारणी अयोग्य आहे त्यामुळे ग्राहकाने चुकीच्या वीज बिलाबाबत मंचाकडे सादर केलेली तक्रार योग्य असल्याचे आढळुन येते. महावितरण कंपनीने चुकीच्या व अवास्तव वीज बिलाबाबत ग्राहकाने सादर केलेल्या तक्रारीची दखल न घेता उलटपक्षी ग्राहकाचा विद्युत पुरवठा दिनांक १९/०३/२००९ कायमचा खंडीत केला तसेच ग्राहकाकडुन तातपुरते देयक रुपये १५००/- व पुर्ण जोडणी आकार देयक रुपये २५/-भरुन घेवुनही त्यांचा वीज पुरवठा त्यांनी मंचात तक्रार दाखल करेपर्यत जोडुन दिला नाही यावरुन महावितरण कंपनीने वरील ग्राहकास पुरविलेल्या सेवेमध्ये अक्षम्य उणीव दिसुन येत असुन वीज ग्राहकाने दाखल केलेली तक्रार योग्य आहे. त्यामुळे झालेल्या मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई मिळण्यास ग्राहक पात्र आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास दिलेल्या माहे एप्रिल २००८ ते १९/०३/२००९ पर्यतच्या कालावधीमधील सर्व वीज देयक रदद्द करण्यात येत आहे.

२) माहे एप्रिल २००८ ते मार्च २००९ च्या कालावधीकरीता दर महा ६० युनिट प्रमाणे आकारणी करुन सुधारीत वीज देयक देण्यात यावे व या देयकावर व्याज,दंड व विलंब आकार लावु नये तसेच वरील कालावधी मध्ये ग्राहकाने भरणा केलेल्या रक्कमेची वजावट सुधारीत वीज बिलातुन करण्यात यावी.

३) महावितराण कंपनीने ग्राहकास झालेल्या मानसिक त्रासापोटी रुपये १०००/- नुकसान भरपाई तीस दिवसाच्या आत द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१९७/२००९/३१** **दिनांक :-**

**प्रति,**

**श्री एकनाथ सखाराम साळवे,**
**नक्षत्रवाडी पैठण रोड,**
**औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१९७/२००९/३१ )

आपण दिनांक २३/०३/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**